राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या योजनेंतर्गत पुनर्वसन व विस्तारीकरण यासाठी मुदती कर्ज मंजुर करण्याबाबत .
श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः सूतगि ११०९/प्र.क्र.१२८/टेक्स-१ (अ)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख : १९ मार्च, २०१९.

संदर्भ :-

१. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सूतगि ११९७/प्र.क्र.१९३/टेक्स १, दिनांक २४ मार्च, १९९९.
२. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सूतगि ११२०००/प्र.क्र.१२१/टेक्स १, दिनांक १७ नोव्हेंबर, २०००.
३. शासन पत्र समक्रमांक दिनांक २६ मे, २०१४.
४. रा. स. वि. नि. पत्र क्रमांक NCDC -२०-३/२०१४-Tex/१०९/SA ४००६१, दिनांक २२ ऑगस्ट,२०१४,
५. वित्त विभाग पत्र क्र.शादिक २०१५/प्र.क्र.९१/ऋहक, दि.३ नोव्हेंबर, २०१५
६. शासन निर्णय क्रमांक : सूतगि ११०९/प्र.क्र.१२८/टेक्स-१ (अ), दिनांक ३१.३.२०१८
७. संचालक वस्त्रोद्योग यांचे पत्र क्र. कार्या ६ (१)/सूतगि/८९२०/२०१८, दिनांक २४ ऑगस्ट, २०१८
८. शासन निर्णय क्र. बैठक १५१६/प्र.क्र.६०/टेक्स-१(अ), दि.२०.७.२०१८
९. श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर यांचे दि.१८.४.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

राज्याची मर्यादित साधनसामुग्री लक्षात घेता, सहकारी सूतगिरण्यांना त्यांच्या आधुनिकीकरण / विस्तारीकरण व पुनर्वसन करण्यासाठी तसेच प्रकल्प उभारणीसाठी अर्थसहाय्य करण्याच्या योजना राज्यात दि.१७/११/२०००च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. या योजनेस अनुसरुन राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने सूतगिरण्यांचे पुनर्वसन / विस्तारीकरण व प्रकल्प उभारणीसाठी संदर्भाधीन अनुक्रमांक ४ येथील दि.२२.८.२०१८ च्या पत्रान्वये श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर च्या रु.३३८०.०० लाख प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावास राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने मान्यता दिली असून आकृतीबंधानुसार मुदत कर्ज रु.१५०२.२८ लाख, शासकीय भागभांडवल (गुंतवणूक कर्ज) रु.९५०.०० लाख, शासकीय अनुदान रु.५०७.०० लाख व सभासद भागभांडवल रु.४२०.७२ लाख असे एकूण रु.३३८०.०० लाखाचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकारी

विकास निगमाने मंजूर केला आहे. त्यानूसार सुतगिरणीस शासकिय रा.स.वि.नि. मुदती कर्जाची उर्वरित व अंतिम हप्त्याची रक्कम रु.१,४८,८९,०००/- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जि. कोल्हापूर या गिरणीच्या रु.३३८०.०० लाख प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावास राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने मान्यता दिली असून आकृतीबंधानुसार मुदत कर्ज रु.१५०२.२८ लाख, शासकीय भागभांडवल (गुंतवणूक कर्ज) रु.९५०.०० लाख, शासकीय अनुदान रु.५०७.०० लाख व सभासद भागभांडवल रु.४२०.७२ लाख असे एकूण रु.३३८०.०० लाखाचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने मंजूर केला आहे. सदर सहकारी सूतगिरणीस रा.स.वि.नि. ने मंजूर केलेल्या रु.१५०२.२८ लाख इतक्या मुदती कर्जापैकी रु.४३६.६६ लाख इतके मुदती कर्ज सन २०१४-१५ मध्ये, रु.४३६.७३ लाख इतके मुदती कर्ज सन २०१५-१६ मध्ये व रु.४८०.०० लाख इतके मुदती कर्ज सन २०१७-१८ मध्ये असे एकूण रु.१३५३.३९ लाख इतके रा.स.वि.नि. मुदती कर्ज मंजूर करण्यात आले आहे. सदर सूतगिरणीस रु.१४८.८९ लाख इतके रा.स.वि.नि. मुदती कर्ज देय आहे. सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या योजनेतून सूतगिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण- सहकारी सूतगिरण्यांना कर्जे (रा.स.वि.नि. पुरस्कृत) या योजनेखाली अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे रु.१५,३५,३६,०००/- (रुपये पंधरा कोटी पस्तीस लाख छत्तीस हजार फक्त) तरतूद उपलब्ध असून वित्त विभागाच्या दि.२५.०१.२०१९ च्या शासन परिपत्राकानुसार १००% रक्कम म्हणजे रु.१५,३५,३६,०००/- (रुपये पंधरा कोटी पस्तीस लाख छत्तीस हजार फक्त) खर्च करण्याबाबत परवानगी देण्यात आली होती. सदर मंजूर तरतूदीतून रु.१,४८,८९,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठेचाळीस लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतकी रक्कम रा.स.वि.नि. मुदती कर्जाची उर्वरित व अंतिम हप्त्याची रक्कम म्हणून दि.१७.११.२००० शासन निर्णयातील अटी तसेच खालील अटींच्या अधिन राहून श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जि. कोल्हापूर या सूतगिरणीस मंजूर करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सूतगि ११९७/प्र.क्र.१९३/ टेक्स १, दिनांक २४/३/१९९९, तसेच संदर्भ क्रमांक ४ येथील राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या दि.२२.४.२०१८ च्या पत्रांमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती सदर गिरणीस बंधनकारक राहतील. तसेच, मुदती कर्जासाठी व

शासकीय भागभांडवलासाठी शासनाने / राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने भविष्यात आणखी काही अटी व शर्ती निश्चित केल्यास, त्या गिरणीस बंधनकारक राहतील, अशा अतिरिक्त अटी व शर्ती च्या अधीन राहून, सदर रक्कम मंजूर करण्यात येत आहे. शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सदर मुदती कर्जाचा परतावा संबंधीत गिरणीकडून शासनास विहित वेळेत व विहित मुदतीत प्रदान होईल, यासंदर्भात संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी काटेकोर अंमलबजावणी करावी.

३. वरील मंजूर करण्यात आलेले रा.स.वि.नि. मुदती कर्ज गिरणीने आठ वर्षाच्या कालावधीमध्ये व्याजासह परत करावयाचे आहे. सूतगिरणीवर रा.स.वि.नि. च्या दि.२२.८.२०१४ रोजीच्या पत्रातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच सदर मुदती कर्ज गिरणीस खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

१) रा.स.वि.नि. मुदती कर्ज परतफेडीबाबत रा.स.वि.नि. ने दिलेल्या शेडयुलप्रमाणे करण्याची जबाबदारी गिरणीची / गिरणीच्या संचालक मंडळाची राहील. याबाबत संचालक मंडळाकडून संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी तसे बंधपत्र घ्यावे तसेच कर्जाच्या परतफेडीबाबत काटेकोरपणे नियंत्रण ठेवावे.

२) रा.स.वि.नि. मुदती कर्ज परतफेडीबाबत रा.स.वि.नि. ने दिलेल्या शेडयुलप्रमाणे गिरणीने / विद्यमान संचालक मंडळाने कार्यवाही केली नाही तर सदर कर्ज घेतेवेळी कार्यरत असणाऱ्या विद्यमान संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तेतून कर्जाचा हप्ता भरण्यात यावा.

३) ज्या कारणासाठी सदर सूतगिरणीस रा.स.वि.नि. मुदती कर्ज मंजूर करण्यात येणार आहे. त्या कारणासाठीच सदर कर्जाचा विनियोग करण्याची जबाबदारी गिरणीच्या विद्यमान संचालक मंडळाची राहील. जर गिरणीने कर्जाचा विनियोग इतर कारणासाठी केल्यास सदर कर्जाची वसूली सदर कर्ज घेतेवेळी कार्यरत असणाऱ्या विद्यमान संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तेतून करण्यात यावी.

४) या सूतगिरणीस मिळालेले अर्थसहाय्य संबंधित प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. या अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास, संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एक रकमी वसूल करण्यात येईल. तसेच, अशा प्रकरणी संबंधित संचालक मंडळास व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

४. सदर रा.स.वि.नि. मुदती कर्ज शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-२१९३/ प्र.क्र.१८३/टेक्स-१, दिनांक ११.८.१९९३ व सूतगि-११९७/ प्र.क्र.१९३/ टेक्स-१, दि. २४.३.१९९९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती तसेच शासकीय भाग भांडवलासंदर्भात शासनाने भविष्यात आणखी काही

अटी व शर्ती निश्चित केल्यास अशा अतिरिक्त अटी व शर्ती सदर सूतगिरणीस लागू राहतील या मुद्दयाच्या अधीन राहून तसेच खाली नमूद केलेल्या अतिरिक्त अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे:-

१) प्रस्तुत सूतगिरणींकडून, शासन निर्णय, स.,प. व व. विभाग, क्र. सूतगि-२१९३/ प्र.क्र.१८३/टेक्स-१, दिनांक ११.८.१९९३ व दिनांक २४.३.१९९९ मधील अटी व शर्तींचे पालन होत आहे याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी खात्री करावी.

२) शासकीय भागभांडवलाच्या वसुलीबाबत संदर्भ क्र. १ येथील दि. २४.३.१९९९ च्या शासन निर्णयातील अ.क्र.५ मध्ये, दि. १०.७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार सूतगिरणीने भागभांडवलाचा पहिला हप्ता स्विकारल्यानंतर ५ वर्षांनी किंवा सूतगिरणी सुरु झाल्यानंतर ३ वर्षांनी यापैकी जे आधी घडेल तेव्हापासून उचल केलेल्या भागभांडवलाची परतफेड १/१५ प्रमाणे सुरु करण्यात येईल आणि असे न केल्यास त्यावर दरसाल दर शेकडा १२% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

३) सदर सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन त्याबाबतच्या प्रगतीचा तिमाही अहवाल संचालक वस्त्रोद्योग यांनी विहित विवरणपत्रात शासनास सादर करावा.

४) दि.२०.७.२०१८ च्या शासन निर्णयानुसार संचालक वस्त्रोद्योग यांनी पुढील ३ महिन्यांत सदर सूतगिरणीच्या विद्यमान संचालक मंडळाकडून, प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत होणा-या रु.१,४८,८९,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठेचाळीस लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतक्या रकमेच्या १०% इतक्या वैयक्तिक मत्तेचे तारण मिळवावे. जोपर्यंत असे वैयक्तिक तारण प्राप्त होणार नाही, तोपर्यंत प्रस्तुत वितरीत रक्कम गिरणीस खर्च करता येणार नाही, तसेच तोपर्यंत या आदेशाद्वारे मंजूर केलेल्या रकमेवर सूतगिरणीस अधिकर्ष (overdraft) काढून रक्कम खर्च करता येणार नाही असे बंधन संचालक वस्त्रोद्योग यांनी संबंधित बँकेवर घालावे. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी काटेकोरपणे व तातडीने कार्यवाही करावी.

५) प्रस्तुत सूतगिरणीच्या संचालक मंडळाची निवडणूक झाल्यास, नवनियुक्त संचालक मंडळास ३ महिन्यांच्या आत वैयक्तिक मालमत्तेचे तारण द्यावे लागेल. नवनियुक्त संचालक मंडळाने असे तारण दिल्यानंतरच पूर्वीच्या संचालक मंडळाचे वैयक्तिक तारण मुक्त करण्यात येईल अशी सुधारणा संस्थेच्या Bye-Laws मध्ये करण्याची कार्यवाही संचालक वस्त्रोद्योग यांनी करावी.

६) सूतगिरणीच्या प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाच्या Financial Closer चा पुरावा शासनास सादर केल्याशिवाय शासनाचा हिस्सा देता येणार नाही. त्यामुळे त्याबाबतची खात्री संचालक

वस्त्रोद्योग यांनी करुन घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी.

७) प्रस्तुत सूतगिरणीकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करुन कार्यक्षमतेने विनियोग करीत असल्याची खात्री संचालक वस्त्रोद्योग यांनी करावी.

८) प्रस्तुत सूतगिरणीने कर्जाची उचल करुन त्याचा विनियोग प्रकल्प उभारणीसाठी करुन लवकर प्रकल्प पूर्ण करावा. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण ठेवावे.

९) प्रकल्प अहवालातील अनुज्ञेय तरतुदीपेक्षा त्या त्या बाबीवर होणारा जास्तीचा खर्च गिरणी स्वनिधीतून करील या अटीवर रा.स.वि.नि. मुदती कर्ज मंजूर करण्यात येत आहे याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी तशी कार्यवाही करावी.

१०) सदर सहकारी सूतगिरण्यांच्या खरेदीबाबत खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे अदा करावी. निविदेमध्ये विवक्षित तरतूद असल्याशिवाय पुरवठादारास अग्रीम अदा करण्यात येऊ नये याबबात संचालक वस्त्रोद्योग यांनी खात्री करावी.

११) गिरणीस प्राप्त झालेल्या रा.स.वि.नि. मुदती कर्जाचा / भागभांडवलाचा तसेच गिरणीकडे शिल्लक असलेल्या रकमेचा गिरणी योग्य प्रकारे विनियोग करते किंवा नाही याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण ठेवावे.

१२) सूतगिरणीने भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात यावी. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण करावे.

१३) प्रस्तुत गिरणीने खरेदी केलेल्या वस्तू प्रत्यक्ष प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा करावे. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण करावे.

१४) खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

१५) सूतगिरणीची उभारणी विहित कालमर्यादेत पूर्ण करावी.

१६) सूतगिरणीच्या सर्व सभासदांचे आधारकार्ड सूतगिरणीशी जोडण्यात यावे.

५. वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये, “५५-कर्जे व अग्रीम” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र. ७(१)(आ), ७(२), ७(३), ७(४), ७(६) व ७(९) या प्रकरणी लागू नसून परिच्छेद क्र.६अ), ६ब), ६क) ७(१)(अ), ७(५), ७(७), ७(८) व ८ मधील तरतूदी या प्रकरणी लागू असून सदर तरतुदींची सदर प्रकरणी खालीलप्रमाणे पूर्तता होत आहे.

६अ) एखाद्या योजनेस / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे :- श्री. व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी , जि.कोल्हापूर या सूतगिरणीस वित्त व नियोजन विभागाच्या सहमतीने रा.स.वि.नि., नवी दिल्ली यांचेकडील दि.२२.८.२०१४ च्या पत्रानुसार ३३८०.०० लाख विस्तारीकरण व पुनर्वसनाकरिता प्रकल्प अहवाल किंमतीस मंजूरी देण्यात आली आहे.

६ब) नियतव्यय उपलब्धता :- सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद ९.२) मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली नियतव्यय अर्थसंकल्पित आहे.

६क) व ७) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये, “५५-कर्जे व अग्रीम” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास वित्तीय अधिकार प्राप्त आहेत.

७(१) (अ) पूर्वी खर्च केलेल्या अनुदानाबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे :- सदर सुतगिरणीस यापूर्वी दिनांक २०.०७.२०१८ पर्यंत प्राप्त रु.२७२९.४२ लाख रक्कमेपैकी प्रकल्पाच्या उभारणीवर एकूण रु.१७७७.०१ लाख (७५%रक्कम) खर्च केले असल्याबाबत विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (सूतगिरण्या), इचलकरंजी यांनी प्रमाणित केले आहे.

७(५) बांधकाम विषयक प्रस्तावा संदर्भात प्रशासकीय / तांत्रिक मान्यता :- सहकारी सूतगिरण्यांच्या बांधकामाबाबत तसेच यंत्रसामुग्री खरेदीबाबत राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

७(७) कार्यालयीन खरेदीसाठीची कार्यपद्धती :- खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी या अटीचा उल्लेख शासन निर्णयात केला आहे.

७(८) संक्षिप्त देयक प्रलंबितता :- सदर लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक तपशीलवार देयक सादर करण्यासाठी प्रलंबित नाही.

८ तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची प्रतिपूर्ती होत असून त्यास नियोजन व वित्त विभागाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

६. वित्त विभागाच्या दि.३.११.२०१५ च्या पत्रास अनुसरुन श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर या सहकारी सूतगिरणीस या शासन निर्णयांन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.१४८.८९ लाख इतक्या रा.स.वि.नि. योजनेंतर्गत एकूण कर्ज परतफेडीचे हप्ते / कर्ज परतफेडीच्या हप्त्याची रक्कम / कर्ज परतफेडीच्या हप्त्याचा कालावधी कर्ज परतफेडीसाठी सवलतीचा कालावधी (moratoerium period) पुढीलप्रमाणे राहील.

अ) श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर यांनी रु.१४८.८९ लाख इतके रा.स.वि.नि. मुदती कर्ज ८ वर्षाच्या कालावधीमध्ये व्याजासह परतफेड करावी.

आ) प्रस्तुत आठ वर्षामध्ये २ वर्ष सवलतीचा कालावधी (moratoerium period) आहे.

इ) सदर कर्जावरील व्याजाचा दर १२.५० टक्के राहील.

ई) प्रस्तुत कर्जाचा हप्ता मुदतीत कर्ज न भरल्यास एक टक्का जास्त दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल. तसेच हप्ता थकल्यास रु.२.५० टक्के दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल. तसेच रा. स. वि.नि. ने व्याज दरामध्ये बदल केल्यास तो सुधारित व्याज दर सदर सूतगिरणीवर बंधनकारक राहील.

उ) प्रस्तुत कर्जाच्या परतफेडीचे परिशिष्ट (Re-payment Schedule) विवरणपत्र-अ सोबत जोडले आहे.

६.१ श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर या सहकारी सूतगिरणीस या शासन निर्णयांन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.१४८.८९ लाख इतक्या रा.स.वि.नि. योजंनेंतर्गत मुदती कर्जाचा परतफेडीसाठी निश्चित केलेला कर्ज हप्त्याचा दिनांक ३१ ऑक्टोबर वार्षिक आहे. तसेच कर्ज परतफेडीच्या पहिल्या हप्त्याचा दिनांक ३१.१०.२०१९ असून दिनांक ३१.१०.२०२६ कर्ज परतफेडीच्या शेवटच्या हप्त्याचा दिनांक आहे.

६.२. प्रस्तुत कर्जाच्या वसुलीचे मुख्य लेखाशिर्ष, तपशिलवार लेखाशिर्ष, योजना सांकेतांक सहीत (Scheme Code) खालीलप्रमाणे आहे :-

"मुख्यलेखाशिर्ष ६४२५, सहकारासाठी कर्जे, १०८, इतर सहकारी संस्थांना कर्जे (००) (०७) सहकारी कताई गिरण्यांना कर्जे (६४२५५२०८)"

६.३. प्रस्तुत कर्जाच्या अनुषंगाने कर्जावरील व्याज / दंडनीय व्याज वसुलीचे मुख्य लेखाशीर्ष, योजना सांकेतांक सहीत (Scheme Code) (दंडनीय व्याजबाबत गौण शिर्ष, योजना सांकेतांक सहीत ((Scheme Code) खालीलप्रमाणे आहे :-

"००४९, व्याजाच्या जमा रकमा, १९५, सहकारी संस्थांकडून व्याज (०१) (१०) सहकारी कताई गिरण्या (००४९१२१९)"

६.४. श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर या सहकारी सूतगिरणीस या शासन निर्णयांन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.१४८.८९ लाख इतक्या रा.स.वि.नि. योजंनेंतर्गत मुदती कर्जाचा अनुषंगाने या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्यासाठी तसेच प्रस्तूत कर्जाची कर्ज परतफेड शेडयूलप्रमाणे वसूलीसंदर्भात

संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या व्दारे नोडल ऑफीसर नियुक्त करण्यात येत आहे.

प्रस्तुत सूतगिरणीस रा.स.वि.नि. योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या मुदती कर्जाची परतफेड सदर शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या कर्ज परतफेड (Repayment Schedule) नुसार विहित वेळेत गिरणीमार्फत होईल यासाठी आवश्यक असलेली सर्व दक्षता संचालक, वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी घ्यावी.

तसेच वित्त विभागाच्या दिनांक दिनांक ०२.०४.२०१८ च्या शासन निर्णयातील तपासणी सूचीतील अ.क्र. ८ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे.

७. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- ब मधील २) नुसार, वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ च्या परिशिष्टातील अनु. क्र. १, २, ४, ५, ६ व ७ या प्रकरणी लागू नसल्याने व परिशिष्टातील अ.क्र. ३ बाबत नमूद करण्यात येते की, सदर योजना ही नियमित स्वरुपाची राज्य योजनांतर्गत योजना असल्याने तसेच योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत नसल्याने व “५५ कर्जे व अग्रीम” या बाबीखाली शासकीय भाग भांडवलाचे वितरण सदर प्रकरणी करीत असल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

८. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद-ब मधील ३ नुसार, वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ सोबतच्या परिशिष्टातील अनु. क्र. ८ संदर्भातील तपासणी सुचीमधील या प्रकरणी लागू असलेल्या मुद्दयांची पूर्तता होत आहे.

९. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- अ) नुसार प्रस्तुत प्रकरणाची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ अन्वये, ५५-कर्जे व अग्रीम” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

२) मंजूर निधी :- "मागणी क्र.व्ही-५, लेखाशीर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे, (००) १०८, इतर सहकारी संस्थांना कर्जे, (०४) सहकारी सूत गिरण्यां, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०४) (०८) सहकारी सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण - सहकारी सूत गिरण्यांना कर्जे(रा.स.वि.मं. पुरस्कृत) (६४२५ ०५६५) या खाली रु.१५३५.३६ लाख इतकी तरतूद प्राप्त झाली असून वित्त विभागाच्या दि.०२.०४.२०१८

च्या परिपत्राकानुसार १००% रक्कम म्हणजे रु.१५३५.३६ लाख खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी सन २०१८-१९ मध्ये कोणतीही रक्कम खर्च झालेली नाही.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे :- सदर सूतगिरणीस दि.२०.७.२०१८ पर्यंत प्राप्त झालेल्या रु.२७२९.४२ इतक्या रक्कमेतून दि.२०.७.२०१८ अखेर रु.१७७७.०१ लाख (७५%) खर्च केल्याचे संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी दि.२४.०८.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे, त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- या योजनेखाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे :- लागू नाही.

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- सूतगिरणीच्या स्थापत्य बांधकामाच्या निविदांना मंजूरी देण्यासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीची मान्यता घेऊनच सूत गिरणीने बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदी करणे बंधनकारक आहे.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत :- सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीबाबत राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

९) खरेदी विषयक प्रक्रिया संबंधित अद्यावत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा:- याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

१०) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरीत करावी :- याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

१०. या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेली रा.स.वि.नि.योजनेंतर्गत मुदती कर्ज रक्कम रु.१,४८,८९,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठेचाळीस लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतकी रक्कम सदर सूतगिरणी संदर्भात संचालक, वस्त्रोद्योग यांचे कडून प्राप्त झालेले बँक खाते, आयडीबीआय बँक, शाखा इचलकरंजी, खाते क्रमांक ४६७१२०१०००५५८० IFCS: IBKL०००४६७ मध्ये RTGS द्वारे जमा

करावी. गिरण्यांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, कराव्या लागणाऱ्या खर्चासंदर्भात शासन निर्णय क्रमांक सूतगि १२००/११७१३/प्र.क्र.४२६/टेक्स-१ (अ), दिनांक १५.६.२००६ अन्वये स्थापन केलेल्या संबंधीत सनियंत्रण समित्यांची मान्यता घ्यावी. गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

११. पुनर्वसन / विस्तारीकरण केल्यानंतर गिरणी वर्धनक्षमतेने चालेल व राज्य शासनाच्या अर्थसहाय्याची परतफेड विहित वेळेत गिरणीमार्फत होईल यासाठी आवश्यक असलेली सर्व दक्षता संचालक वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी घ्यावी.

१२. राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या पुनर्वसन / विस्तारीकरण योजनेंतर्गत या सूतगिरण्यांना मिळालेले अर्थसहाय्य संबंधित प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. या अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास, संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एक रकमी वसूल करण्यात येईल. तसेच, अशा प्रकरणी संबंधीत संचालक मंडळास व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

१३. श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या. इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर (SHRI VYANKTESH SHETKARI VINKARI SAHAKARI SOOT GIRNI LTD., ICHALKARANJI, DIST. KOLHAPUR) या सूतगिरणीस या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रा.स.वि.नि. मुदती कर्ज रक्कम रु.१,४८,८९,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठेचाळीस लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतकी रक्कम रा.स.वि.नि. योजनेंतर्गत मुदती कर्ज चा खर्च "मागणी क्र.व्ही-५, लेखाशीर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे, (००) १०८, इतर सहकारी संस्थांना कर्जे, (०४) सहकारी सूत गिरण्यां, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०४) (०८) सहकारी सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण - सहकारी सूत गिरण्यांना कर्जे(रा.स.वि.मं. पुरस्कृत) (६४२५ ०५६५)- ५५ कर्जे व अग्रीम" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

१४. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेली रु.१,४८,८९,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठेचाळीस लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतकी रक्कम रा.स.वि.नि. योजनेंतर्गत मुदती कर्ज ची रक्कम संचालक, वस्त्रोद्योग यांचे कडून प्राप्त झालेले बँक खाते, आयडीबीआय बँक, शाखा इचलकरंजी, खाते क्रमांक ४६७१२०१०००५५८० मध्ये **RTGS** द्वारे श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या. इचलकरंजी, जिल्हा कोल्हापुर या सूतगिरणीस RTGS द्वारे निधी वितरीत करण्याची कार्यवाही

करण्याकरीता श्री.र. ग. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, श्री. ब. बा. चव्हाण, सह सचिव (सूतगिरणी), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या. इचलकरंजी, जिल्हा कोल्हापुर (SHRI VYANKTESH SHETKARI VINKARI SAHAKARI SOOT GIRNI LTD., ICHALKARANJI, DIST. KOLHAPUR) यांच्या आयडीबीआय बँक, शाखा इचलकरंजी, IDBI BANK, ICHALKARNJI, DIST KOLHAPUR या बॅकेच्या खाते क्रमांक ४६७१२०१०००५५८० IFSC: IBKL०००४६७ मध्ये **RTGS** द्वारे सदर रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

१५. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८ अन्वये विभागास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तसेच नियोजन विभाग व वित्त विभगाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.१५५/२०१९/व्यय-२, दि.२०/२/२०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१९१६५६०७९३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-op Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233edb83a20c38834c19f2e3793, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2019.03.20 15:53:59 +05'30'

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर,
२. महालेखापाल, (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर,
३. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक,
४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (४ प्रतींसह)
५. कार्यासन अधिकारी, १६-सी, १७-सी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
६. वित्त विभाग, व्यय-२ / अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२,
७. नियोजन विभाग, कार्यासन-१४३१, मंत्रालय, मुंबई-३२,
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,

९. संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१०. प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, सोलापूर,
११. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर,
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२ प्रती),
१५. व्यवस्थापक, आय.डी.बी.आय. बँक, शाखा इचलजकरंजी, जि.कोल्हापूर
१६. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई-१,
१७. अध्यक्ष, श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या. इचलकरंजी, जिल्हा कोल्हापुर
१८. निवडनस्ती (टेक्स १ अ / ब).

शासन निर्णय, क्र.सूतगि ११०९/प्र.क्र.१२८/टेक्स-१ (अ)
दि. १९ मार्च, २०१९ चे सहपत्र.

<u>विवरणपत्र - अ</u>

कर्जाच्या परतफेडीचे परिशिष्ट (Re-payment Schedule)

श्री व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर

(रुपये लाखात)

मंजूर रक्कम	हप्ता	हप्ता दिनांक	परतफेडीचा शेडयूल		
१४८.८९			**मुद्दल**	**व्याज**	**एकूण**
	१	१९/०३/२०१९	०.००	१८.६१	१८.६१
	२	१९/०३/२०२०	०.००	१८.६१	१८.६१
	३	१९/०३/२०२१	२४.८२	१८.६१	४३.४३
	४	१९/०३/२०२२	२४.८२	१५.५१	४०.३३
	५	१९/०३/२०२३	२४.८२	१२.४१	३७.२३
	६	१९/०३/२०२४	२४.८२	९.३०	३४.१२
	७	१९/०३/२०२५	२४.८२	६.२०	३१.०२
	८	१९/०३/२०२६	२४.८२	३.१०	२७.९२
		एकूण	**१४८.८९**	**१०२.३६**	**२५१.२७**